# डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम

# खान अकॅडमी प्लॅटफॉर्म शिक्षक मार्गदर्शिका

**खान अकॅडमी प्लॅटफॉर्म सोबत नवीन शैक्षणिक वर्षात तुमचे स्वागत आहे!**

शैक्षणिक वर्ष 2026-27 ची सुरुवात करताना, **ही मार्गदर्शिका तुम्हाला वर्ग तयार करण्यापासून** ते **विद्यार्थ्यांमधील गणित आणि विज्ञानाबद्दलचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि मास्टरी प्राप्त करण्यासाठी** मदत करेल.

**यावर्षी आपली वाटचाल तीन स्पष्ट उद्दिष्टांच्या दिशेने असेल:**

- **प्रत्येक विद्यार्थ्याला सक्रिय करणे: 15 ऑगस्ट पर्यंत, 100% विद्यार्थी खान अकॅडमी प्लॅटफॉर्मवर लॉग इन करतील** आणि **किमान एक शैक्षणिक कृती पूर्ण करतील** याची खात्री करणे.
- **मासिक मास्टरीची सवय लावणे:** दरमहा, प्रत्येक विद्यार्थी **गणितातील किमान 4 कौशल्ये आणि विज्ञानातील किमान 4 कौशल्यांमध्ये प्रविण किंवा मास्टरी** प्राप्त करेल.
- **वर्षअखेरपर्यंत मास्टरी मिळवणे:** शैक्षणिक वर्षाच्या शेवटी, प्रत्येक विद्यार्थी **गणितातील किमान 36 आणि विज्ञानातील किमान 36 कौशल्यांमध्ये प्रविण किंवा मास्टरी** प्राप्त करेल.

# खान अकॅडमी प्लॅटफॉर्म
# शिक्षक मार्गदर्शिका

एकत्रितपणे, ही उद्दिष्टे **अभ्यासाची सातत्यपूर्ण सवय लावण्यास मदत** करतात आणि वर्षभरात **गणित आणि विज्ञानातील प्रगती सुनिश्चित** करतात.

प्रत्येक वर्ग वेगळा असतो. त्यामुळे या मार्गदर्शिकेत **शिक्षकांच्या तीन परिस्थिती सोप्या ओळखीसाठी वेगवेगळ्या रंगांमध्ये दर्शविल्या आहेत,** जेणेकरून तुम्ही तुमच्या परिस्थितीनुसार योग्य मार्ग निवडू शकाल.

प्रत्येक वर्गासाठी:

- तुमच्या वर्गाशी जुळणारी **परिस्थिती ओळखा**
- तुमच्यासाठी योग्य असलेली **शिक्षक परिस्थिती निवडा**
- दिलेले **टप्पे एकामागून एक पूर्ण करा**

**महत्त्वाची टीप: लक्षात ठेवा, प्रत्येक विद्यार्थ्याचे खान अकॅडमीवर एकच खाते असावे आणि नवीन विद्यार्थ्यांची खाती फक्त गणिताच्या शिक्षकांनीच खाते तयार करावीत. विज्ञान शिक्षकांनी केवळ विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गात जोडून घ्यावे.**

ही मार्गदर्शिका वर्षभर तुमच्यासोबत ठेवा. वर्ग तयार करताना, विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाच्या चांगल्या सवयी विकसित करताना आणि प्रत्येक विद्यार्थ्याला मास्टरीच्या प्रवासात मदत करताना याचा वापर करा.

चला, एकत्रितपणे हे **वर्ष प्रत्येक विद्यार्थ्यासाठी कुतूहल, आत्मविश्वास आणि अर्थपूर्ण शिक्षणाचे** वर्ष बनवूया.

शुभेच्छा!

# शैक्षणिक वर्ष 2026-27: शिक्षकांसाठीचे मुख्य टप्पे

## टप्पा 1


| खान अकॅडमी प्लॅटफॉर्मची सुरुवात | पान 5 - 43 |
|---|---|
| तुमच्या शिक्षक खात्यात साइनअप/लॉग इन करा | पान 6 |
| तुमच्या वर्गाच्या परिस्थिती नुसार पर्याय निवडा | पान 7 |
| खान अकॅडमी संलग्न शाळेचा बॅनर तपासा | पान 36 |
| वर्गासाठी मास्टरी ध्येय नियुक्त करा | पान 37 - 39 |
| विद्यार्थ्यांना सक्रिय करणे | पान 40 - 43 |


## टप्पा 2


| वर्गातील अध्यापनासाठी पूरक वापर | पान 44 - 51 |
|---|---|
| तुमच्या वर्गात खान अकॅडमी प्लॅटफॉर्मचा वापर | पान 45 |
| युनिट मास्टरी ध्येय नियुक्त करा | पान 46 |
| शाळेतील सराव | पान 47 |
| वर्गाबाहेरील सराव (पालक-शिक्षक सभा) | पान 48 |
| विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा | पान 49 |
| खानमिगोमधील शिक्षक साधनांचा वापर | पान 50 - 51 |

# शैक्षणिक वर्ष 2026-27: शिक्षकांसाठीचे मुख्य टप्पे

## टप्पा 3


| | |
|---|---|
| **खान अकॅडमीच्या मदतीने वैयक्तिकृत शिक्षण** | **पान 52 - 57** |

मास्टरी ध्येयावरील प्रगतीचा आढावा घेणे पान 53

कौशल्य अहवालाद्वारे वैयक्तिकृत शिक्षण देणे पान 54

विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे कौतुक करणे पान 55

कार्यक्रमाचे शैक्षणिक वर्ष 2026-27 कॅलेंडर पान 58




# टप्पा 1

# खान अकॅडमी प्लॅटफॉर्मची सुरुवात


| | |
|---|---|
| तुमच्या शिक्षक खात्यात साइनअप/लॉग इन करा | पान 6 |
| तुमच्या वर्गाच्या परिस्थिती नुसार पर्याय निवडा | पान 7 |
| खान अकॅडमी संलग्न शाळेचा बॅनर तपासा | पान 36 |
| वर्गासाठी मास्टरी ध्येय नियुक्त करा | पान 37 - 39 |
| विद्यार्थ्यांना सक्रिय करणे | पान 40 - 43 |


पान 5 - 43

# चला, खान अकॅडमी प्लॅटफॉर्मवर सुरुवात करूया!

तुमच्या **खान अकॅडमी शिक्षक खात्यात लॉग इन करून** सुरुवात करा. प्लॅटफॉर्मवर नवीन आहात? तुमचे **शिक्षक खाते तयार करण्यासाठी** आणि सुरुवात करण्यासाठी खालील सूचनांचे पालन करा.







**1.1** शिक्षक खाते तयार करण्यासाठी mr.khanacademy.org ला भेट द्या आणि "मी एक शिक्षक आहे" यावर क्लिक करा.

**1.2** "साइन अप" वर क्लिक करा. "खान अकॅडमी सेवा अटी आणि गोपनीयता धोरण" या बॉक्सवर टिक करा, तुमचा ईमेल आणि पासवर्ड टाका आणि "साइन अप" वर क्लिक करा.

# तुमचा खान अकॅडमी प्लॅटफॉर्म वरील प्रवास सुरू करूया

**तुम्ही शिकवत असलेल्या प्रत्येक वर्गासाठी, तुमच्या परिस्थितीशी जुळणारा**
पर्याय आणि तुमच्याशी मिळतीजुळती शिक्षक श्रेणी ओळखा.

**तुमच्या विद्यार्थ्यांचे खान अकॅडमी खाते आहे का?**

- **होय** → **आपण मागील वर्षी याच वर्गाचे शिक्षक होता का?**
  - **होय**

    

    **पर्याय 1: रेखा मॅडम**
    **गणित: इयत्ता ७वी**

    **माझ्या विद्यार्थ्यांची खान अकॅडमी खाती आहेत, जी मी गेल्या वर्षी तयार केली होती.**

    → **वर्गाचे नाव आणि कोर्स बदला**
    पान 8 - 14

  - **नाही**

    

    **पर्याय 2: सतीश सर**
    **विज्ञान: ७वी**

    **माझ्या विद्यार्थ्यांची खान अकॅडमी खाती दुसऱ्या शिक्षकांनी तयार केली आहेत.**

    → **विद्यार्थ्यांसोबत वर्ग कोड शेअर करा**
    पान 15 - 24

- **नाही**

  

  **पर्याय 3**
  **चैताली मॅडम**

  **विद्यार्थ्यांकडे खान अकॅडमी खाती नाहीत (उदा. इयत्ता 1)**

  → **विद्यार्थ्यांची खाती तयार करा**
  पान 25 - 35

# पर्याय 1
## रेखा मॅडम

एकूण लागणारा वेळ = 5 - 10 मिनिटे

माझ्या विद्यार्थ्यांची खान अकॅडमी खाती आहेत, जी मी गेल्या वर्षी तयार केली होती. चला, या शैक्षणिक वर्षासाठी एकत्रितपणे वर्गाचे नाव आणि कोर्स बदलूया.



पुढील पाने तुम्हाला वर्गाचे नाव आणि कोर्स बदलण्यासाठी मार्गदर्शन करतील. तुम्हाला या प्रवासात मदतीची गरज असल्यास:

**"वर्गाचे नाव आणि कोर्स बदला" व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.**

**अडचण येत असल्यास सपोर्ट टीमशी संपर्क साधा:**

**कॉल करा:** 011-41168778
सपोर्ट टीमसोबत बोलण्यासाठी

**व्हॉट्सअॅप करा:** 73038 82661
सपोर्ट टीमसोबत चॅट करण्यासाठी

## पर्याय 1 | रेखा मॅडम

# वर्गाचे नाव आणि कोर्स बदला



**पर्याय 1.** **तुमचा नोंदणीकृत ईमेल आयडी आणि पासवर्ड वापरून खान अकॅडमी प्लॅटफॉर्मवर लॉग इन करून सुरुवात करा.**







**1.1** लॉग इन करण्यासाठी **mr.khanacademy.org ला भेट द्या**

**1.2** लॉग इन करण्यासाठी तुमचा **नोंदणीकृत ईमेल आयडी आणि पासवर्ड** वापरा

पर्याय 1 | रेखा मॅडम

# वर्गाचे नाव आणि कोर्स बदला



पर्याय 2.

## आता, चालू वर्षासाठी वर्गाचे नाव बदलूया आणि कोर्स बदलूया.







2.1 शिक्षक डॅशबोर्ड मध्ये, ज्या वर्गाचे नाव बदलायचे आहे तो निवडा आणि वर्गाच्या शेजारी असलेल्या **तीन बिंदूंवर क्लिक करून "सेटिंग" निवडा.**

2.2 खाली स्क्रोल करा. 'वर्गाची माहिती' अंतर्गत, **"वर्ग डिस्प्ले नाव" बदला** आणि "**जतन करा**" वर क्लिक करा.

# वर्गाचे नाव आणि कोर्स बदला



## पर्यय 2. आता, चालू वर्षासाठी वर्गाचे नाव बदलूया आणि कोर्स बदलूया.







**2.3** पुढे, त्याच पानावर, **"कोर्स बदला"** वर क्लिक करा.

**2.4** या शैक्षणिक वर्षासाठी योग्य **कोर्स निवडा** आणि **"जतन करा"** वर क्लिक करा.

# वर्गाचे नाव आणि कोर्स बदला



## पर्याय 2. आता, चालू वर्षासाठी वर्गाचे नाव बदलूया आणि कोर्स बदलूया.




**2.5** अभिनंदन! तुम्ही चालू शैक्षणिक वर्षासाठी वर्गाचे नाव यशस्वीपणे बदलले आहे आणि कोर्स बदलला आहे.

## पर्याय 1 | रेखा मॅडम

# वर्गाचे नाव आणि कोर्स बदला



## पर्याय 3. तुमचा वर्ग चालू शैक्षणिक वर्षासाठी सक्रिय असल्याची पुष्टी करा.




**3.1** एकदा चालू शैक्षणिक वर्षासाठी वर्गाचे नाव आणि कोर्स बदलला की, तुम्हाला असा पॉप-अप दिसेल.
वर्ग हटवला जाऊ नये म्हणून "**वर्ग सक्रिय असल्याची पुष्टी करा**" वर क्लिक करा.

# चला, प्रगतीचा आढावा घेऊया

## अभिनंदन!
## तुम्ही टप्पा 1 पूर्ण करण्याच्या अगदी जवळ आहात.

**तुम्ही पूर्ण केलेल्या पायऱ्या:**

- तुमच्या शिक्षक खात्यात साइनअप/लॉग इन करणे ☑
- विद्यार्थी नोंदणीसाठी योग्य पर्याय निवडणे ☑
- वर्ग सक्रिय असल्याची पुष्टी केली ☑

**टप्पा 1 पूर्ण करण्यासाठी फक्त 3 पायऱ्या बाकी आहेत:**


खान अकॅडमी संलग्न शाळेचा बॅनर तपासा — पान 36

वर्गासाठी मास्टरी ध्येय नियुक्त करा — पान 37 - 39

विद्यार्थ्यांना सक्रिय करणे — पान 40 - 43

# पर्याय 2
## सतीश सर

एकूण लागणारा वेळ = 20 - 25 मिनिटे

माझ्या विद्यार्थ्यांची खान अकॅडमी खाती दुसऱ्या शिक्षकांनी तयार केली आहेत. चला, एकत्रितपणे विद्यार्थ्यांसोबत वर्ग कोड शेअर करूया आणि त्यांना वर्गात सामील करून घेऊया.



पुढील पाने तुम्हाला विद्यार्थ्यांसोबत वर्ग कोड कसा शेअर करावा, याचे मार्गदर्शन करतील.

**"वर्ग कोड शेअर करूया" व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.**

**अडचण येत असल्यास सपोर्ट टीमशी संपर्क साधा:**

**कॉल करा:** 011-41168778
**सपोर्ट टीमसोबत बोलण्यासाठी**

**व्हॉट्सॲप करा:** 73038 82661
**सपोर्ट टीमसोबत चॅट करण्यासाठी**

**पर्याय 2 | सतीश सर**

# विद्यार्थ्यांसोबत वर्ग कोड शेअर करा



**पर्याय 1.** **तुमचा नोंदणीकृत ईमेल आयडी आणि पासवर्ड वापरून खान अकॅडमी प्लॅटफॉर्मवर लॉग इन करा.**







**1.1** लॉग इन करण्यासाठी **mr.khanacademy.org ला भेट द्या**

**1.2** लॉग इन करण्यासाठी तुमचा **नोंदणीकृत ईमेल आयडी आणि पासवर्ड** वापरा

पर्याय 2 | सतीश सर

# विद्यार्थ्यांसोबत वर्ग कोड शेअर करा



## पर्याय 2. आता, या शैक्षणिक वर्षासाठी नवीन वर्ग तयार करण्यास सुरुवात करूया.







**2.1** शिक्षक डॅशबोर्ड मध्ये, **"नवीन वर्ग जोडा" वर क्लिक करा.**

**2.2** **तुमच्या वर्गाचे नाव <विषय_वर्ग_तुकडी_शैक्षणिक वर्ष> या स्वरूपात टाका. त्यानंतर "पुढे" वर क्लिक करा.**

**पर्याय 2 | सतीश सर**



# विद्यार्थ्यांसोबत वर्ग कोड शेअर करा

**पर्याय 2.** **आता, या शैक्षणिक वर्षासाठी नवीन वर्ग तयार करण्यास सुरुवात करूया.**







**2.3** तुमच्या वर्गासाठी **कोर्स निवडा** आणि **"जतन करा"** वर क्लिक करा

**2.4** ही पायरी **"वगळा"** काळजी करू नका, **तुम्ही विद्यार्थी नंतर जोडू शकता!**

## पर्याय 2 | सतीश सर

# विद्यार्थ्यांसोबत वर्ग कोड शेअर करा



**पर्याय 2.** आता, या शैक्षणिक वर्षासाठी नवीन वर्ग तयार करण्यास सुरुवात करूया.




**2.5** अभिनंदन! तुम्ही चालू शैक्षणिक वर्षासाठी यशस्वीपणे नवीन वर्ग तयार केला आहे. तुम्ही आता हा वर्ग तुमच्या शिक्षक डॅशबोर्डवर पाहू शकता.

पर्याय 2 | सतीश सर

# विद्यार्थ्यांसोबत वर्ग कोड शेअर करा



## पर्याय 3. आता, आपला तयार केलेला नवीन वर्ग खान अकॅडमी संलग्न शाळेला जोडूया.







**3.1** शिक्षक डॅशबोर्ड मध्ये, वर्गावरील **तीन बिंदूंवर क्लिक करा.**

**3.2** ड्रॉपडाउन मेनूमधून "**खान अकॅडमी संलग्न असलेल्या शाळेला जोडा**" वर क्लिक करा.

# विद्यार्थ्यांसोबत वर्ग कोड शेअर करा



*पर्याय 3.* **आता, आपला नवीन तयार केलेला वर्ग खान अकॅडमी संलग्न शाळेला जोडूया.**







**3.4** वर्गाच्या वर **खान अकॅडमीला जोडलेला वर्ग**चा बॅनर दिसेल.

**3.3** एक शाळा निवडण्याचा पॉप-अप दिसेल. **त्यातील तपशील भरा आणि "जतन करा"** वर क्लिक करा.

## पर्याय 2 | सतीश सर

# विद्यार्थ्यांसोबत वर्ग कोड शेअर करा



पर्याय ५. **शेवटी, विद्यार्थ्यांना वर्ग कोड शेअर करूया आणि त्यांना वर्गात सामील करून घेऊया.**




**४.१** नवीन तयार केलेल्या वर्गासाठी "**सेटिंग**" वर क्लिक करा.




**४.२** किंवा, या पानावरून **खाली स्क्रोल करा आणि “सेटिंग”** वर क्लिक करा.

# विद्यार्थ्यांसोबत वर्ग कोड शेअर करा



**पर्याय ५.** **शेवटी, विद्यार्थ्यांना वर्ग कोड शेअर करूया आणि त्यांना वर्गात सामील करून घेऊया.**




**४.३** **वर्ग कोड** वहीत **नोंदवून घ्या** आणि वर्गात **विद्यार्थ्यांसोबत शेअर करा.**

# चला, प्रगतीचा आढावा घेऊया

## अभिनंदन!
## तुम्ही टप्पा 1 पूर्ण करण्याच्या अगदी जवळ आहात.

**तुम्ही पूर्ण केलेल्या पायऱ्या:**

- तुमच्या शिक्षक खात्यात साइनअप/लॉग इन करणे ☑
- विद्यार्थी नोंदणीसाठी योग्य पर्याय निवडणे ☑
- वर्ग सक्रिय असल्याची पुष्टी केली ☑

**टप्पा 1 पूर्ण करण्यासाठी फक्त 3 पायऱ्या बाकी आहेत:**

खान अकॅडमी संलग्न शाळेचा बॅनर तपासा — पान 36

वर्गासाठी मास्टरी ध्येय नियुक्त करा — पान 37 - 39

विद्यार्थ्यांना सक्रिय करणे — पान 40 - 43

# पर्याय 3
# चैताली मॅडम

एकूण लागणारा वेळ = 25 - 30 मिनिटे

**माझ्या विद्यार्थ्यांकडे (उदा. इयत्ता 1) अद्याप खान अकॅडमी खाती नाहीत. चला, एकत्रितपणे त्यांची खाती तयार करूया आणि त्यांना वर्गात सामील करून घेऊया.**

***<u>टीप: जर तुम्ही विज्ञानाचे शिक्षक असाल, तर कृपया पान 6 वरील पर्याय 2 चे पालन करा (पर्याय 3 नाही).</u>***



पुढील पाने तुम्हाला विद्यार्थ्यांची खाती तयार करण्यासाठी मार्गदर्शन करतील. तुम्हाला या प्रवासात मदतीची गरज असल्यास:

**<u>“विद्यार्थ्यांचे खाते तयार करा” व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.</u>**

**अडचण येत असल्यास सपोर्ट टीमशी संपर्क साधा:**

**कॉल करा:** 011-41168778
**सपोर्ट टीमसोबत बोलण्यासाठी**

**<u>व्हॉट्सअॅप करा:</u>** <u>73038 82661</u>
**सपोर्ट टीमसोबत चॅट करण्यासाठी**

## पर्याय 3 | चैताली मॅडम

# विद्यार्थ्यांची खाती तयार करा



**पर्याय 1.** **तुमचा नोंदणीकृत ईमेल आयडी आणि पासवर्ड वापरून खान अकॅडमी प्लॅटफॉर्मवर लॉग इन करा.**







**1.1** लॉग इन करण्यासाठी **mr.khanacademy.org ला भेट द्या**

**1.2** लॉग इन करण्यासाठी तुमचा **नोंदणीकृत ईमेल आयडी आणि पासवर्ड** वापरा

# विद्यार्थ्यांची खाती तयार करा



## पर्याय 2. आता, या शैक्षणिक वर्षासाठी नवीन वर्ग तयार करण्यास सुरुवात करूया.







**2.1** शिक्षक डॅशबोर्ड मध्ये, **"नवीन वर्ग जोडा"** वर क्लिक करा.

**2.2** **तुमच्या वर्गाचे नाव <विषय_वर्ग_तुकडी_शैक्षणिक वर्ष> या स्वरूपात टाका. त्यानंतर "पुढे" वर क्लिक करा.**

# पर्याय 3 | चैताली मॅडम



## विद्यार्थ्यांची खाती तयार करा

**पर्याय 2.** **आता, या शैक्षणिक वर्षासाठी नवीन वर्ग तयार करण्यास सुरुवात करूया.**




**2.3** तुमच्या वर्गासाठी **कोर्स निवडा** आणि **"पुढे"** वर क्लिक करा




**2.4** ही पायरी **"वगळा"** काळजी करू नका, **तुम्ही विद्यार्थी नंतर जोडू शकता!**

# विद्यार्थ्यांची खाती तयार करा



पर्याय 2. **आता, या शैक्षणिक वर्षासाठी नवीन वर्ग तयार करण्यास सुरुवात करूया.**




2.5 **अभिनंदन! तुम्ही चालू शैक्षणिक वर्षासाठी यशस्वीपणे नवीन वर्ग तयार केला आहे. तुम्ही आता हा वर्ग तुमच्या शिक्षक डॅशबोर्डवर पाहू शकता.**

## पर्याय 3 | चैताली मॅडम

# विद्यार्थ्यांची खाती तयार करा



## पर्याय 3. आता, आपला नवीन तयार केलेला वर्ग खान अकॅडमी संलग्न शाळेला जोडुया




3.1 शिक्षक डॅशबोर्ड मध्ये, वर्गावरील **तीन बिंदूंवर क्लिक करा.**




3.2 ड्रॉपडाउन मेनूमधून "**खान अकॅडमी संलग्न असलेल्या शाळेला जोड**" वर क्लिक करा.

## पर्याय 3 | चैताली मॅडम

# विद्यार्थ्यांची खाती तयार करा



**पर्याय 3.** **आता, आपला नवीन तयार केलेला वर्ग खान अकॅडमी संलग्न शाळेला जोडुया**







**3.3** एक शाळा निवडण्याचा पॉप-अप दिसेल. त्यातील **तपशील भरा आणि "जतन करा"** वर क्लिक करा.

**3.4** वर्गाच्या वर **खान अकॅडमीला जोडलेला वर्गाचा बॅनर** दिसेल.

# विद्यार्थ्यांची खाती तयार करा



## पर्याय ५. आता, विद्यार्थ्यांची खाती तयार करूया आणि त्यांना त्यांचे लॉग इन तपशील शेअर करूया.







**४.१** नवीन तयार केलेल्या वर्गासाठी "**विद्यार्थी जोडा**" वर क्लिक करा.

**४.२** दिलेल्या पर्यायांपैकी, "**तुमच्या विद्यार्थ्यांचे खाते तयार करा**" वर क्लिक करा.

# विद्यार्थ्यांची खाती तयार करा



पर्यय ५.

## आता, विद्यार्थ्यांची खाती तयार करूया आणि त्यांना त्यांचे लॉग इन तपशील शेअर करूया.







**४.३** **"विद्यार्थ्याचे नाव"** टाका. अधिक विद्यार्थ्यांसाठी **"+ नवीन ओळ जोडा"** वर क्लिक करा.

**४.४** प्रत्येक विद्यार्थ्याचा **डीफॉल्ट पासवर्ड शोधण्यासाठी उजवीकडे स्क्रोल करा**. तुम्ही ते बदलू देखील शकता.

## पर्याय 3 | चैताली मॅडम

# विद्यार्थ्यांची खाती तयार करा



**पर्याय ५.** **आता, विद्यार्थ्यांची खाती तयार करूया आणि त्यांना त्यांचे लॉग इन तपशील शेअर करूया.**







**४.५** **CSV फाईल डाऊनलोड करा.** यामध्ये नवीन तयार केलेले विद्यार्थी युजरनेम आणि पासवर्ड असतील.

**४.६** **अभिनंदन! तुम्ही यशस्वीपणे विद्यार्थ्यांची खाती तयार केली आहेत.**

# चला, प्रगतीचा आढावा घेऊया

## अभिनंदन!
## तुम्ही टप्पा 1 पूर्ण करण्याच्या अगदी जवळ आहात.

**तुम्ही पूर्ण केलेल्या पायऱ्या:**

- तुमच्या शिक्षक खात्यात साइनअप/लॉग इन करणे ☑
- विद्यार्थी नोंदणीसाठी योग्य पर्याय निवडणे ☑
- वर्ग सक्रिय असल्याची पुष्टी केली ☑

**टप्पा 1 पूर्ण करण्यासाठी फक्त 3 पायऱ्या बाकी आहेत:**

खान अकॅडमी संलग्न शाळेचा बॅनर तपासा — पान 36

वर्गासाठी मास्टरी ध्येय नियुक्त करा — पान 37 - 39

विद्यार्थ्यांना सक्रिय करणे — पान 40 - 43

# महत्त्वाची स्टेप:
# "खान अकॅडमी संलग्न शाळेचा" बॅनर तपासा

## पर्याय 1




जर तुम्हाला तुमच्या 2026-27 च्या वर्गासाठी हा बॅनर दिसत असेल, तर वर्ग हटवला जाऊ नये म्हणून "वर्ग सक्रिय असल्याची पुष्टी करा" वर क्लिक करा.

## पर्याय 2

## पर्याय 3




किंवा

तुमच्या 2026-27 च्या वर्गावर "खान अकॅडमीला जोडलेला वर्ग" बॅनर दिसत असल्याची खात्री करा. जर दिसत नसेल, तर तुमच्या पर्यायावर पुन्हा जा किंवा ही स्टेप पूर्ण करण्यासाठी व्हिडिओ पाहण्यास QR कोड स्कॅन करा.

**अडचण येत असल्यास? सपोर्ट टीमशी संपर्क साधा:**

**कॉल करा: 011-41168778 सपोर्ट टीमसोबत बोलण्यासाठी**
**व्हॉट्सॲप करा: 7303882661 सपोर्ट टीमसोबत चॅट करण्यासाठी**



# वर्गासाठी मास्टरी ध्येय नियुक्त करा

आतापर्यंत तुम्ही तुमचा वर्ग तयार केला आहे, विद्यार्थी जोडले आहेत आणि पार्टनरशिप शाळा नियुक्त केली आहे. पुढे, चला तुमच्या वर्गासाठी युनिट मास्टरी ध्येय नियुक्त करूया.

"वर्गासाठी मास्टरी ध्येय नियुक्त करणे" हा व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा किंवा क्लिक करा.

# मास्टरी ध्येय नियुक्त करणे







1.1 शिक्षक डॅशबोर्ड मध्ये, वर्गावरील **तीन ठिपक्यांवर क्लिक करा आणि "सेटिंग"** निवडा.

1.2 **"मास्टरी ध्येय"** अंतर्गत, युनिट नियुक्त करण्यासाठी **"नियुक्त करा"** वर क्लिक करा.

# मास्टरी ध्येय नियुक्त करणे




**1.3**

खाली स्क्रोल करून "**कोर्स निवडा**" वर जा, “कंटेंट निवडा” मध्ये "**यूनिट मास्टरी ध्येय**" निवडा आणि नंतर "**देय तारीख ठरवा**".
सर्व पूर्ण झाल्यावर "**2 यूनिट ध्येय तयार करा**" वर क्लिक करा.



# विद्यार्थ्यांना सक्रिय करणे - 3 सोप्या स्टेप्समध्ये


| | | |
|---|---|---|
| पर्याय 1. | विद्यार्थी आणि पालकांना युजरनेम आणि पासवर्ड द्या | पान 41 |
| पर्याय 2. | डेमो क्लास घ्या आणि URL तसेच लॉग-इन प्रक्रियेची माहिती द्या | पान 42 |
| पर्याय 3. | प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांचे खान अकॅडमी खाते सक्रिय करण्यासाठी मदत करा | पान 43 |


"विद्यार्थ्यांना सक्रिय करणे" व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा किंवा क्लिक करा.

# विद्यार्थ्यांना सक्रिय करणे

## पर्याय 1. विद्यार्थी आणि पालक यांना युझरनेम आणि पासवर्ड द्या.



1.1 विद्यार्थ्यांना त्यांच्या वहीत लिहून घेण्यास सांगा.




1.2 लॅबमध्ये किंवा वर्गात लॉग-इन तपशील प्रदर्शित करा.




1.3 पालकांना लॉग-इन प्रक्रियेची माहिती द्या.

# विद्यार्थ्यांना सक्रिय करणे

## पर्याय 2. डेमो क्लास घ्या आणि URL तसेच लॉग-इन प्रक्रियेची माहिती द्या.










**2.1**

विद्यार्थ्यांना *mr.khanacademy.org* वर जाण्यास सांगा

**2.2**

विद्यार्थ्यांना त्यांचे युजरनेम आणि पासवर्ड टाकण्यास सांगा.

**2.3**

विद्यार्थ्यांना त्यांना नियुक्त केलेली मास्टरी ध्येय आणि कंटेंट कुठे शोधायचा ते दाखवा.

# विद्यार्थ्यांना सक्रिय करणे

## पर्याय ३. प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांचे खान अकॅडमी खाते सक्रिय करण्यासाठी मदत करा






### ३.१

प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःचा आयडी आणि पासवर्ड वापरून लॉग इन करण्यासाठी मदत करा आणि खालील गोष्टी पूर्ण करून घ्या:

- किमान एक व्हिडिओ पाहणे
- किमान एक सराव संच सोडवणे

### ३.२

**तुमच्या शिक्षक खात्यामध्ये कृती आढावा अहवाल** तपासा आणि **प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एकदा लॉग इन केले आहे** आणि त्यांचा **अभ्यासाचा वेळ दिसत** आहे याची खात्री करा.



# टप्पा 2

# खान अकॅडमीच्या मदतीने वर्गातील अध्यापनाला पूरक जोड द्या


| | |
|---|---|
| तुमच्या वर्गात खान अकॅडमी प्लॅटफॉर्मचा वापर कसा करावा | पान 45 |
| युनिट मास्टरी ध्येय नियुक्त करा | पान 46 |
| शाळेत सराव | पान 47 |
| वर्गाबाहेर सराव (पालक-शिक्षक सभा साहित्य) | पान 48 |
| विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेणे | पान 49 |
| खानमिगो शिक्षक टूल्सचा वापर | पान 50 - 51 |


पान 44 - 51

# खान अकॅडमी प्लॅटफॉर्म तुमच्या अध्यापनात कशी मदत करू शकते?

## वर्गातील अध्यापनादरम्यान



शिक्षक अभ्यासक्रमानुसार वर्गात विषय शिकवतात



शिक्षक विद्यार्थ्यांना युनिट मास्टरी ध्येय नियुक्त करतात

## प्लॅटफॉर्मवर सराव करताना



विद्यार्थी खान अकॅडमी तासिकेमध्ये वर्गात सराव करतात*



विद्यार्थी पालकांच्या मदतीने घरी सराव करतात

## वर्ग संपल्यानंतर



शिक्षक, खान अकॅडमी शिक्षक डॅशबोर्डवरील 'कृती आढावा' अहवालात विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतात. या माहितीचा वापर करून ते विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे मदत कशी करता येईल, हे ठरवतात.

*विद्यार्थ्यांना खान अकॅडमीवर सराव करण्यासाठी वेळापत्रकात दरमहा किमान एक तास असावा.

# युनिट मास्टरी ध्येय नियुक्त करा

**युनिट मास्टरी ध्येय नियुक्त करणे ही तुमच्या खान अकॅडमी प्रवासातील एक महत्त्वाची पायरी आहे आणि प्रत्येक वेळी नवीन यूनिट सुरू करताना ती पूर्ण केली पाहिजे.**

## युनिट मास्टरी ध्येय समजून घेऊया

1. **युनिट मास्टरी ध्येय म्हणजे काय?**
   **युनिट मास्टरी ध्येयामध्ये एका धड्याशी संबंधित सर्व कौशल्यांचे व्हिडिओ आणि सराव प्रश्न** असतात.

2. **मास्टरी ध्येय का नियुक्त करावे?**
   विद्यार्थ्यांसाठी हा स्वतंत्र आणि **स्वत:च्या गतीने केलेला सराव** आहे. **शिक्षकांसाठी प्रगतीचा आढावा** घेणे यामुळे सोपे होते.

3. **मास्टरी ध्येय कधी नियुक्त करावे?**
   **नवीन धडा शिकवण्यास सुरुवात करतानाच** ते नियुक्त करा. वर्गातील अभ्यास आणि मास्टरी ध्येय यांचा ताळमेळ असणे गरजेचे आहे.

## युनिट मास्टरी ध्येय कसे नियुक्त करावे?

**व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.**

OR

**किंवा प्रत्येक वेळी नवीन युनिट सुरू करताना मास्टरी ध्येय नियुक्त करण्यासाठी** **पान 37 - 39 वरील पायऱ्या वापरा.**

# शाळेत खान अकॅडमी प्लॅटफॉर्मवर सराव

## वेळापत्रकात प्लॅटफॉर्मच्या वापरासाठी तासिकेचे नियोजन



| CLASS TEACHERS NAME | PERIODS / Class | I<br>9:45am To 10:25 am | II<br>10:30 am To 11:10 am | III<br>11:15 am To 11:55 am | IV<br>12:00am To 12:40 pm | Lunch Break<br>12:40 am TO 1:40 pm | V<br>1:45 pm To 2:25 pm | VI<br>2:25 pm To 3:05 pm | VII<br>3:05 pm To 3:45 pm | Extra Class/Remedial class<br>3:45 pm To 4:25 pm | SIGNATURE<br>------ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| USHA KIRAN | VI | ENGLISH (USHA KIRAN) | MON - LIB. P.E.D (RACHNA SINGH) | HINDI POONAM KUSHWAHA | SCIENCE (PRITI YADAV) | LUNCH | S.ST (USHA KIRAN) | MATHS (MANOJ KUMAR) | DRAWING (PRITI YADAV) / KHAN ACADEMY | KHAN ACADEMY (MONDAY / REMEDIAL CLASS USHA KIRAN | |
| RACHNA SINGH | VII | P.E.D (RACHNA) TUE-LIB | S.S.T (NANDLAL) | SCIENCE ( PRITI YADAV) | MATH (MANOJ KUMAR) | | ENGLISH (DIVYA JOSHI) | HINDI (POONAM KUSHWAHA) | DRAWING (MANOJ KUAMR)/ KHAN ACADEMY | KHAN ACADEMY / TUESDAY REMEDIAL (SEEMA NIGAM) | |
| POONAM KUSHWAHA | VIII | HINDI (POONAM KUSHWAHA) | ENGLISH (DIVYA JOSHI) | MATH (DHARMENDER KUMAR) | SCIENCE (SEEMA NIGAM) | | DRAWING (MANOJ KUAMR)/ KHAN ACADEMY | S.S.T (DIVYA JOSHI)) | KHAN ACADEMY (CLASS) | WED-LIB. P.E.D (RACHNA SINGH)/ REMEDIAL (PRITI YADAV) | |
| NANDLAL | IX | S.S.T (NANDLAL) | SCIENCE (SEEMA NIGAM) | HINDI (VANDNA YADAV) | THUR - LIB. P.E.D (RACHNA SINGH) | | DRAWING (NANDLAL)/ KHAN ACADEMY | MATH/H.SCI DHARMENDER KUMAR / SEEMA NIGAM) | ENGLISH (USHA KIRAN) | ENGLISH LITRECY KHAN ACADEMY / THURSDAY REMEDIAL (MANOJ KUMAR) | |
| PRITI YADAV | X | SCIENCE ( PRITI YADAV) | MATH/ H.SCI (DHARMENDER KUMAR / PRITI YADAV) | ENGLISH (USHA KIRAN) | S.S.T (NANDLAL) | | FRI - LIB. ALL DAYS P.E.D (RACHNA SINGH) | DRAWING (USHA KIRAN) | HINDI (POONAM KUSHWAHA) | T.C.S ( PRITI YADAV) REMEDIAL (NAND LAL) | |
| SEEMA NIGAM | XI | MATH / BIO (ANSHU TOMAR/ SEEMA NIGAM) | PHYSICS ( AKANSHA CHAUHAN) | | CHEM (TANU CHAUDAHRY) | | HINDI (VANDANA YADAV) | SAT - LIB. ALL DAYS P.E.D (RACHNA SINGH) | ENGLISH (DIVYA JOSHI) | PHY/CHE/ BIO(PRACTICALS) / ENG. LITRECY / SATURDAY REMEDIAL | |

**तुमच्या वेळापत्रकात गणित आणि विज्ञानाचा सराव करण्यासाठी प्रत्येकी 1 तासिका निश्चित करा.**

## उपलब्ध असलेल्या कोणत्याही साधनाद्वारे सराव सुरू करा



**कॉम्प्युटर लॅब**



**स्मार्ट पॅनल**



**टॅब्लेट्स / स्मार्टफोन**

# वर्गाबाहेर सराव

**प्रत्येक विद्यार्थ्याच्या शिकण्याच्या प्रवासात पालक हे महत्त्वाचे भागीदार आहेत. प्रभावी पालक-शिक्षक सभा (PTM) आयोजित** करण्यासाठी, खान अकॅडमी प्लॅटफॉर्म त्यांच्या पाल्याला कशी मदत करते हे स्पष्ट करण्यासाठी आणि ते घरी वापरू शकतील अशा टूल्सची माहिती देण्यासाठी या संसाधनांचा वापर करा.

1. **PTM प्रेझेंटेशन**
   पालक-शिक्षक सभेमध्ये पालकांना खान अकॅडमी प्लॅटफॉर्मची माहिती देण्यासाठी याचा वापर करा.

2. **PTM FAQ**
   खान अकॅडमी प्लॅटफॉर्मबद्दल पालकांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी हा दस्तऐवज तुम्हाला मदत करेल.

3. **वर्गाबाहेर सरावाचे व्हिडिओ**
   घरी केलेल्या अभ्यासाचा विद्यार्थ्यांच्या जीवनावर होणारा सकारात्मक परिणाम दर्शवणारे छोटे व्हिडिओ.

4. **पालकांसाठी पत्र**
   पालकांना डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रमाची ओळख करून देणारे तयार पत्र.

**वर्गाबाहेर सराव: चित्रपटांमधील काही भाग**







# विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेणे

## प्रत्येक विद्यार्थ्याने साध्य करायची मासिक उद्दिष्टे

प्रत्येक विद्यार्थ्याने दरमहा खालील बाबींमध्ये प्रवीण किंवा मास्टरी प्राप्त केली पाहिजे:

**गणितातील 4 कौशल्ये** आणि **विज्ञानातील 4 कौशल्ये**

## मास्टरी लेव्हलचा अर्थ:

| | |
|---|---|
| परिचित | पहिल्या प्रयत्नात 71% गुण मिळवले |
| प्रवीण | व्हिडिओ पुन्हा पाहिले, सूचना (hints) वापरल्या आणि पुन्हा प्रयत्न केला |
| मास्टरी प्राप्त | युनिट टेस्टमध्ये सर्व प्रश्नांची उत्तरे बरोबर दिली. |




## विद्यार्थ्यांची प्रगती आणि संपादन केलेली कौशल्ये यांचा आढावा घ्या.



# खानमिगो शिक्षक टूल्सचा वापर

**खानमिगो हा तुमचा AI-आधारित शिक्षक सहाय्यक** आहे, जो तुम्हाला रोजच्या कामात मदत करतो जेणेकरून तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देऊ शकाल.

तुमच्या शिक्षक डॅशबोर्डवर याचा वापर करण्यासाठी खालील स्टेप्स फॉलो करा:




**1.1** **खानमिगोचा चेहरा असलेल्या आयकॉनवर** क्लिक करा.




**1.2** त्यानंतर "**शिक्षक टूल्स**" वर जा.

# खानमिगो शिक्षक टूल्सचा वापर

**खानमिगो हा तुमचा AI-आधारित शिक्षक सहाय्यक आहे जो तुम्हाला तुमच्या रोजच्या कामात मदत करतो,** जेणेकरून तुम्ही तुमच्या सर्वात महत्त्वाच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकाल: तुमच्या विद्यार्थ्यांकडे तुमचे पूर्ण लक्ष देणे.




काही लोकप्रिय खानमिगो टूल्स:

- **लेसन प्लॅन** - हे तुम्हाला तुमच्या आवडीच्या कोणत्याही विषयासाठी सविस्तर प्लॅन किंवा फक्त रूपरेषा तयार करण्यात मदत करते.

- **प्रश्न निर्माण करा** - मूल्यमापन, सराव चाचण्या, भेदभाव आणि उपचारात्मक शिक्षणासाठी प्रश्न त्वरित तयार करण्यास मदत करते.

- **वर्गाबद्दल माहिती** - तुमच्या विद्यार्थ्यांची कामगिरी आणि कल तयार करून त्याचा आढावा घेते.

तुमचे रोजचे अध्यापन सोपे करण्यासाठी खानमिगोमध्ये अजून बरीच टूल्स आहेत. त्यांचा शोध घ्या आणि तुमच्या दैनंदिन कामात त्यांचा समावेश करा.




# टप्पा 3

# खान अकॅडमी प्लॅटफॉर्मच्या च्या मदतीने वैयक्तिकृत शिक्षण


| | |
|---|---|
| मास्टरी ध्येयांवरील प्रगतीचा आढावा घेणे | पान 53 |
| कौशल्य अहवाल वापरून वैयक्तिकृत शिक्षण देणे | पान 54 |
| विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे कौतुक करणे | पान 55 |
| KAI FAQ सेंटर | पान 56 |
| शैक्षणिक वर्ष 2026-27 कॅलेंडर | पान 57 |


पान 52 - 57

# मास्टरी ध्येयांवरील प्रगतीचा आढावा घेणे

**युनिट मास्टरी ध्येयांवरील** तुमच्या विद्यार्थ्यांच्या **प्रगतीचा आढावा घ्या** आणि त्यांना आवश्यकतेनुसार वैयक्तिक मदत करा.







1. **मास्टरी ध्येयांतर्गत प्रगती अहवाल** उघडा.
2. **वर्ग निवडा** आणि **प्रत्येक विद्यार्थ्याची ध्येय पूर्ण करण्याची प्रगती** तपासा.
3. **संबंधित विद्यार्थ्यांना आठवण** करून द्या.
4. ज्या विद्यार्थ्यांनी ***80%* मास्टरी प्राप्त** केली आहे त्यांचे **कौतुक करा.**

**"मास्टरी ध्येयांवरील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा कसा घ्यावा" हा व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा किंवा क्लिक करा.**

# कौशल्य अहवाल वापरून वैयक्तिकृत शिक्षण देणे

कौशल्य अहवाल प्रत्येक कौशल्यावर विद्यार्थी नेमका कुठे आहे हे दर्शवतो, ज्यामुळे तुम्हाला विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार अध्यापनाचे नियोजन करण्यास मदत होते.




## मास्टरी लेव्हलनुसार तुम्ही विद्यार्थ्यांना कशी मदत करू शकता:

**प्रयत्न केला आहे** — संकल्पनेतील त्रुटी किंवा मागील मूलभूत गोष्टी पूर्ण करण्यासाठी या विद्यार्थ्यांना अधिक सहकार्याची किंवा पुन्हा शिकवण्याची आवश्यकता आहे.

**परिचित** — या लेव्हलवरील विद्यार्थ्यांना व्हिडिओ पाहिल्यानंतर पुन्हा एकदा प्रयत्न करण्याची गरज आहे. सरावासाठी संबंधित कौशल्य नियुक्त करा.

**प्रवीण** — या विद्यार्थ्यांना संकल्पना अंशतः समजल्या आहेत. संकल्पना अधिक दृढ करण्यासाठी त्यांना युनिट टेस्ट द्या.

**मास्टरी प्राप्त** — या विद्यार्थ्यांचे कौतुक करा! त्यांची परिचित स्तरावर असलेल्या विद्यार्थ्यांसोबत जोडी बनवून एकमेकांना सहाय्य करण्यास प्रोत्साहन द्या.

"कृती आढावा अहवाल कसा तपासावा" हा व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा किंवा क्लिक करा.

# विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे कौतुक करणे

## प्रोग्रेस ट्रॅकर

हे विद्यार्थ्यांच्या मास्टरी प्रगतीचे कौतुक करण्याचे एक साधन आहे. नवीन रिंग्स जोडल्या गेल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांची प्रगती स्पष्टपणे दिसते.




1. **रिंगची विविध लेव्हल्स पूर्ण केल्यावर बक्षिसे** जाहीर करा.
2. **रिंग अनलॉक करण्याची** एक विशिष्ट वेळ ठरवा आणि जाहीर करा.
3. **ॲनिमेशन फक्त एकदाच प्ले केले जाऊ शकते.** जेव्हा सर्वजण पाहत असतील तेव्हाच ते प्ले करा!

# विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे कौतुक करणे

## विद्यार्थ्यांसाठी प्रमाणपत्रे

मास्टरी ध्येयांच्या दिशेने काम करणाऱ्या विद्यार्थ्यांचे **प्रगतीनुसार प्रमाणपत्रे देऊन कौतुक** करा.




**मास्टरी कॅप्टन:**
वेळेत युनिट मास्टरी ध्येय पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी.




**ग्रँड ट्युटर:**
इतर विद्यार्थ्यांना प्रवीण किंवा मास्टरी प्राप्त करण्यास मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी.




**प्रशस्तीपत्र:**
सकारात्मक प्रयत्नांची दखल घेण्यासाठी.

- प्रमाणपत्रे डाउनलोड करण्यासाठी QR कोड स्कॅन करा किंवा लिंकवर क्लिक करा.
- डाउनलोड केल्यानंतर, ही प्रमाणपत्रे प्रिंट करा आणि विद्यार्थ्यांना वितरित करा.

# KAI FAQ सेंटर

विद्यार्थ्यांचा पासवर्ड कसा बदलावा

शिक्षक बदलीनंतर विद्यार्थ्यांना जोडण्याची प्रक्रिया

## वर्गासाठी संसाधने

विद्यार्थ्यांसाठी खान अकॅडमी

अभ्यासाची सवय लावण्यासाठी ट्रॅकर

# डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम शैक्षणिक वर्ष 2026-27 कॅलेंडर

| जून | जुलै | ऑगस्ट |
|---|---|---|
| BOY 1 | BOY 2 | |
| प्रोत्साहनपर उपक्रम 1 | | |
| **सप्टेंबर** | **ऑक्टोबर** | **नोव्हेंबर** |
| CPD 1 | सत्र 1 पूर्ण | दिवाळी सुट्टी |
| प्रोत्साहनपर उपक्रम 2 | | KhanEd 27 |
| **डिसेंबर** | **जानेवारी ‘27** | **फेब्रुवारी ‘27** |
| CPD 2 | | |
| **मार्च ‘27** | **एप्रिल ’27** | **मे ‘27** |
| सत्र 2 पूर्ण | उन्हाळी सुट्टी | |